**दिवाणी किरकोळ अर्ज क. 683/2022 मधील नि.1 वरील आदेश**
**रत्नमाला शिंदे व ईतर विरुध्द निरंक**
**[CNR NO. MHBIO800-1591-2022]**

1. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने बॉम्बे रेग्युलेशन 1827 चे कलम 2 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

2. **अर्जदारांच्या अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे.**

अर्जदार क. 1 ही मयत गंगाधर पि.यशवंत शिंदे यांची पत्नी असुन अर्जदार क. 2 व 3 ही मयताची मुले आणि अर्जाच्या परिच्छेद क. 4 मध्ये दर्शविलेली अर्जदार क.1 ही मयताची विवाहीत मुलगी आहे. मयत गंगाधर पि.यशवंत शिंदे यांचा मृत्यू **दि. 16.07. 2022** रोजी झालेला आहे. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, अशी विनंती केली आहे.

3. प्रस्तुत प्रकरणात आक्षेप मागविण्यासाठी दि. 04.11.2022 रोजी दै. पार्श्वभुमी (नि.क.09) या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन दिले होते. तसेच तहसील कार्यालय, माजलगाव व ग्रामपंचायत कार्यालय, लवूळ, ता.माजलगाव येथे देखील जाहीर प्रगटन डकविण्यात आले होते, परंतु कोणीही आजपर्यत आक्षेप नोंदविला नाही.

4. अर्जदारांतर्फे अर्जदार क.1 तुकाराम पि.गंगाधर शिंदे यांनी त्यांचे अर्जातील कथनाच्या पुष्ठयर्थ स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र (नि.क.10), ग्रामपंचायत कार्यालय, लवूळ, ता. माजलगाव यांनी दिलेले मयताचे मृत्यू प्रमाणपत्राची प्रत नि.क.11, अर्जदार क. 1 ते 3 यांचे आधारकार्डच्या पडताळणी केलेल्या प्रती, तसेच अर्जदार यांचे पेपरमधील जाहीर प्रगटन केल्याची प्रत नि.क.9, जाहिरनामा बजावल्याबाबतचा गोषवारा नि.क.6 अशी कागदपत्रे दाखल केली आहेत, जी अर्जातील कथनांशी सुसंगत व समर्थनीय आहेत.

5. अर्जदारांच्या वारसाबद्दल कोणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे अर्जदार क. 1 ते 3 आणि अर्जाच्या परिच्छेद क.4 मध्ये दर्शविलेली अर्जदार क.1 हे मयत गंगाधर पि.यशवंत शिंदे यांचे वारस असल्याचे दिसुन येत आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

1) प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

2) अर्जदार क्र. 1 ते 3 आणि अर्जाच्या परिच्छेद क्र.4 मध्ये दर्शविलेली अर्जदार क्र.1 हे मयत गंगाधर पि.यशवंत शिंदे यांचे कायदेशीर वारस आहेत असे घोषित करण्यात येते.

3) आवश्यक ती कोर्ट फिस दिल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

सत्यमेव जयते

Digitally signed by
RANjANA
SUKHDEV GOSAVI
Date: 2023.01.09
16:55:23 +0530

दिनांक : 09.01.2023.

ठिकाण : माजलगाव.

**( सौ.आर.एस.गोसावी )**

दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, माजलगाव.

CERTIFICATE

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

Dictated on : 09.01.2023.

Transcribed on : 09.01.2023.

Checked & signed on : 09.01.2023.

Sd/-

Date:09.01.2023.

S.M.Mandavkar

Stenographer-Gr-III

2nd Jt. Civil Court J.D.Majalgaon.